# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना कमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : *coegondwana@gmail.com*

जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./२३८९/२०२४

दिनांक : ८/०७/२०२४

## शैक्षणिक सत्र २०२४–२५ करीता प्रवेशासंबंधी सुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य, पदव्यूत्तर शैक्षणिक विभागातील विभागप्रमूख व विद्यार्थी तसेच संबंधितांना सुचित करण्यात येते की, पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ चे Academic Calender संदर्भ क्र.No./GU/Acad/167/२०२४ दिनांक १६/०५/२०२४ नूसार विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्याची पक्रिया दिनांक ०८/०७/२०२४ पासून संलग्नित महाविद्यालयातील Online प्रणालीव्दारे gug.digitaluniversity.ac किंवा unigug.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ०७/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५:३० पर्यंत पुर्ण करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास व काही अडचण निर्माण झाल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

१. प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देत असतांना विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निहाय अचूक विषय निवडले आहेत किंवा नाही याची खात्री करावी.
२. विद्यार्थी/विद्यार्थीनीचे पूर्ण नाव,(इंग्रजी व मराठी), आईचे नाव, जन्म तारीख, मतदार नोंदणी क्रमांक,आधार क्रमांक, जात, लिंग, माध्यम, मोबाईल नंबर व पत्ता याची अचूक नोंद करावी.
३. सेमीस्टर ची निवड तसेच शैक्षणिक वर्ष अचूक नोंदवावे.
४. पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता इतर विद्यापीठाचे स्थानांतरण प्रमाणपत्र व या विद्यापीठाचे योग्यता प्रमाणपत्र स्विकारून व पडताळणी करूनच विद्यार्थ्याचे प्रवेश निश्चित करण्यात यावे.
५. अभ्यासक्रमानूसार मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील.
६. प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास विनंती अर्ज प्राचार्यामार्फत सादर करून विद्यापीठाकडून प्रवेश रद्द करून घ्यावा.
७. विद्यापीठाचे निदेश (Direction),परीपत्रके, अधिसूचना नूसारच आवश्यक कागदपत्राची (Documents) तपासणी करून नियमानूसार अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यात यावा. चुकीचे प्रवेश देण्यात आल्यास नामांकन केल्या जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची नोद घ्यावी.

टिप:– प्रवेशित विद्यार्थ्याचा **ABC User ID** नमूद करणे आवश्यक आहे.

(दिनेश ज. नरोटे)
संचालक (प्र.)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली